नियमीत दिवाणी दावा क्र. ४/२०२०

दत्तात्रेय वि. नारायण

## निशाणी क्र.२८ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादीने क्रम ११ नियम १ नुसार वादीस लेखी सवाल पट्टी देण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूतचा दावा रक्कम वसुलीकरीता दाखल करण्यात आला असून तथाकथीत हात उसणी रक्कम सन २०११ च्या अनुषंगाने आहे. कैफियतीमध्ये प्रतिवादीने देय असलेली संपूर्ण रक्कम व्याजासह परत केली असल्याचा बचाव घेतला आहे. वादीने तथाकथीत चार लाख रुपयाची रक्कम कधी, कोणत्या कराराने आणि कोणत्या कारणासाठी दिली याबाबत वादपत्रातील मजकूर संदिग्ध आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली. निशाणी क्र.३० कडे वादीने आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास हरकत घेतली आहे. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, वादपत्रात दोन धनादेशांचा उल्लेख करण्यात आला नाही. त्यामुळे दुसरा परत करण्याचा अगर दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादातील रकमेच्या उल्लेखाबाबत वादाचा मजकूर हा पुराव्याचा भाग आहे. सवाल पट्टीतील प्रश्न वादीच्या उलटतपासाच्या वेळीही विचारता येवू शकतात. प्रस्तूतचा अर्ज वेळ काढूपणासाठी दिला असून प्रतिवादीने वादीसोबत झालेला व्यवहार नाकारला नाही. या कारणास्वत वादीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. के. एल. जैन आणि वादीतर्फे विद्वान वकील श्री. एम. जे. तांबडकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा अर्ज, वादीचे म्हणणे, वादपत्र, कैफियत आणि निशाणी क्र.२९ कडील सवाल पट्टी यांचे अवलोकन केले. प्रस्तूतची सवाल पट्टी ही प्रतिवादीने तपशिल मागणी करीता, कागदपत्र दाखल करण्याकरीता आणि वादातील प्रश्नासंबंधी दिली असल्याचे दिसून येते. प्रस्तूत दाव्याच्या स्वरुपाचे अवलोकन केले असता प्रतिवादीद्वारे वादीस देवू केलेली सवाल पट्टी देण्याची परवानगी देणे आवश्यक दिसून येते. करीता मी खालील आदेश पारीत

करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यंत निशाणी क्र.२९ कडील सवाल पट्टीची उत्तरे सादर करावी.

३. पक्षकारांनी प्रस्तूत अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

मुरुड (सं. गं. सरोदे)

दिनांकः ०१/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुरुड